प्रकरण क्र. ४

# 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नाट्यकृतींची वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये

# प्रकरण क्र. ४

# ' 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नाट्यकृतींची वाङ्‌मयीन वैशिष्ट्ये'

सुमारे १७ व्या शतकापासून तमाशा मराठी मनाचे रंजन करत आला आहे. या लोककलेने धार्मिकताही जोपासल्याची दिसते. सुरूवातीला अस्तित्वात असणाऱ्या स्थानिक लोककला-विधिनाट्ये यांच्यातील काही अंश स्वीकारून तमाशाने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले. याच तमाशाचे रंजनसामर्थ आणि लोकप्रियता पाहून तमाशाच्या धर्तीवर लोकनाट्ये निर्माण झाली आणि याच लोकनाट्यांच्या परिशीलनाने वगनाट्य निर्माण झाले. या वगनाट्याने रंगभूमी आणि लोकरंगभूमीचा सुवर्णमध्य साधला. नाटक आणि तमाशा या दोन स्वतंत्र कलांचा रसिकवर्ग एकसंघ करून सर्वसमावेशक असा वगनाट्याचा प्रेक्षक निर्माण केला. त्यातून नाटक आणि तमाशा या दोन्हींची भूक भागविण्याचा प्रयत्न केला.

व्यंकटेश माडगूळकर, वसंत सबनीस, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, रा. रं. बोराडे, चि. त्र्यं. खानोलकर या लेखकांनी वाङ्‌मयीन गुणांनीयुक्त समृद्ध वगनाट्ये लिहिली. वगनाट्याचा स्वतंत्र ठसा उमटविण्यासाठी स्वत:ची लेखणी झिजवली. पारंपारिक तमाशातील वगामध्ये असणारी वाङ्‌मयीन आणि तांत्रिक वैशिष्ट्ये स्वीकारून पाल्हाळरहित तंत्रशुद्ध वगनाट्ये निर्माण केली. स्वत:ची अनेक वगनाट्ये लोकप्रिय केली. सामान्य नागरिकांसह पांढरपेशा प्रेक्षकवर्ग आणि स्त्री प्रेक्षकांनाही वगनाट्याकडे आकृष्ट केले. उपरोक्त सर्व लेखकांपैकी 'हरिभाऊ वडगांवकर' यांच्या 'सावळा कुंभार' या वगातुन दादू इंदुरीकर यांनी निर्माण केलेल्या 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याने आणि वसंत सबनीस यांच्या 'छपरी पलंगाचा वग' या नावाने प्रसिद्ध झालेला आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने रंगभूमीवर आलेल्या वगनाट्याने विशेष लोकप्रियता प्राप्त केली. स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. लोकरंगभूमीवर स्वत:चे वेगळे योगदान दिले. लोकांचा वगनाट्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलवला आणि सर्व वगनाट्यांमध्ये सर्वाधिक यश प्राप्त केले. नवनवीन परंपरा घालून दिल्या.

## अ) नाट्यकृतींचे यश -

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला अमाप लोकप्रियता प्राप्त झाली. एखाद्या नाट्यकृतीला लोकप्रियता प्राप्त होण्यासाठी, रसिक प्रेक्षकांच्या मनावर त्या नाट्यकृतीची भुरळ पडण्यासाठी अनेक गोष्टी कारणीभूत ठरतात. मिळालेली लोकप्रियता टिकवून ठेवणे ही लोकप्रियता प्राप्त करण्यापेक्षा अवघड गोष्ट. पण 'गाढवाचं लग्न' या वगनाट्याने या दोन्ही गोष्टी साध्य केल्या. त्या साध्य करण्यापाठीमागे कथानक, व्यक्तिरेखा, संघर्ष, रसनिर्मिती, कालसापेक्षता अशा अनेक कारणांचा मोलाचा वाटा असतो. या सर्व गोष्टींच्या यशस्वीतेवर नाट्यकृतीचे यश अवलंबून असते. प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यामध्ये या सर्वच गोष्टींचा सुंदर मिलाप घडून आला आणि या वगनाट्याने लोकरंगभूमीवर अमाप यश प्राप्त केले.

भारत हा पूर्वापार धार्मिकतेचे अधिष्ठान असणारा देश. येथील धर्मग्रंथांवर त्या धर्मग्रंथातील कथांवर येथील लोकांची श्रद्धा असते. देव, धर्म, चमत्कार या गोष्टींवर यांचा विश्वास असतो. स्वर्ग आणि नरक या संकल्पना मानणाऱ्या लोकांसमोर 'हरिभाऊ वडगांवकरांनी' 'सावळ्या कुंभार' हा वग सादर केला तेव्हा तो वग अत्यंत लोकप्रिय ठरला. कारण वरील सर्व गोष्टी या वगामध्ये प्रेक्षकांना आढळून आल्या. या वगाची कथाच मुळी 'श्री नवनाथ भक्तिसार' ग्रंथातील २५ व्या अध्यायातील कथा आणि या वगावरून 'दादू इंदुरीकर' यांनी त्या काळातील रंगभूमीवरचे विनोदी नट 'श्री. शंकरराव घाणेकर' यांच्या सल्ल्याने 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य सिद्ध केले.

माणसाला अद्भुतरम्य घटनाप्रसंगांचे आकर्षणक असते त्यामुळे 'गाढवाचं लग्न' मधील अद्भूत घटना प्रसंगांमुळे लोकांचे रंजन होते. त्या अद्भूत प्रसंगाना देवत्वाची जोड असल्याने सावळाचे गाईचे शेपूट धरून स्वर्गात जाणे, देवाचे गाढव आणि पुन्हा गाढवाचा देव होणे यासारख्या असंभाव्य घटनाही संभाव्य पातळीवर येतात. वगनाट्यातील व्यक्तिरेखा या ग्रामीण पार्श्वभूमीवरील असल्याने आणि प्रेक्षक वर्गही ग्रामीण भागातीलच असल्याने प्रेक्षकांना नित्याच्या जीवनात भेटणारी माणसे रंगभूमीवर पहावयास मिळतात. त्यामुळे ती

आपल्यापैकीच कुणीतरी असावी अशी अनुभूती प्रेक्षकांना मिळते. सावळा ही व्यक्तिरेखा गर्भश्रीमंत नसून सर्वसामान्य गरीब कुटुंबातील असल्याने जणू स्वत:च्याच व्यथा, वेदना रंगमंचावर सादर होत असल्याचा भास प्रेक्षकांना होतो, म्हणून सावळा हा प्रेक्षकांच्या जिव्हाळ्याचा नातलगच होतो.

वगनाट्यामध्ये आविष्कृत होणारे महत्वपूर्ण रस म्हणजे 'हास्य आणि अद्भूत रस' होय. जेणेकरून संपूर्ण वगनाट्य सादर होत असताना प्रेक्षक हसून हसून लोटपोट होतात तर कधी आश्चर्यचकित होतात. त्यांच्या मनात कुतूहल निर्माण होते. सावळाचा परिस्थितीशी चाललेला संघर्ष त्याच्या मनातील द्वंद्व हे सर्व प्रेक्षकांच्या मनामध्ये होणाऱ्या संघर्षासारखे असल्याने प्रेक्षकांना स्वत:च्याच परिस्थितीचा कानोसा रंगभूमीवर दिसून येतो.

वगनाट्य सादर होत असताना कथानकाला स्थिर ठेवून संवाद मात्र लवचिकपणे सादर केले जातात. कथेतील काळाचा आणि वर्तमान काळाचा योग्य समन्वय साधून कोटी केली जाते. ती कोटी करत असताना बदलत्या काळात घडलेल्या घटना, घडामोडी, एखादी महत्वपूर्ण व्यक्ती, ठिकाण यांच्या अनुषंगाने कोटी केली जाते. त्यामुळे स्थानिक प्रेक्षकांना अत्यंत आनंद होतो.

उपरोक्त सर्व गुणांनी या वगनाट्याला अमाप यश प्राप्त करून दिले तरीही वगनाट्याचा प्रयोग सादर होत असताना संवादातील लवचिकेतेमुळे काही ठिकाणी मर्यादांचे उल्लंघन झाल्याचे आढळते. उदाहरार्थ सावळा झोपण्याच्या तयारीत असताना प्रेक्षकांना उपवास सोडायला बोलावतो, बृहस्पतीला गुरू मानत असताना त्यांच्याशी असभ्य वर्तन करतो. त्यापुढे जाऊन शांतीचा अर्थ स्त्री असा घेऊन बाई ठेवण्याची भाषा करतो. देवदेवतांची तुलना रमेश देवशी करून रमेश देवला श्रेष्ठ मानतो. येथे धर्मश्रद्धेचा अवमान होताना आढळतो. हा जरी वगनाट्यातील विमुक्ततेचा भाग असला तरी या सर्व वगनाट्याच्या मर्यादा ठरतात. तरीही या वगनाट्याचे लोकरंगभूमीवरील योगदान विचारात घेता मर्यादांनाही मर्यादा पडतात.

अशा अनेक कारणांमुळे प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य यशाच्या शिखरावर विराजमान झाले आणि याच वगनाट्यातील अभिनयामुळे दादू इंदुरीकर यांना 'संगीत नाट्य ॲकॅडमी'चा सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा या वगनाट्याच्या यशात मानाचा तुराच ठरतो.

राजा-राणीच्या कथा ऐकतच समाजातील बहुसंख्य लोक लहानाचे मोठे झाले. त्यामुळे राजा, राणी, कोतवाल, प्रधान, शिपाई यासारख्या पात्रांच्या माध्यमातून 'रजवाडी वग' आणि पुढे 'वगनाट्ये' लोकरंगभूमीवर अवतीर्ण होऊ लागली. या सर्व वगनाट्यातील अत्यंत यशस्वी वगनाट्यांमध्येही अग्रभागी असणारे वसंत सबनीस यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य होय. या वगनाट्यानेही स्वत:चा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग निर्माण केला. अमाप लोकप्रियता प्राप्त केली आणि टिकवून ठेवली. हे यश प्राप्त करण्यासाठी वगनाट्याची बतावणी, कथानक, संवाद रस आणि कालसापेक्षता या गोष्टींचा मिलाप कारणीभूत ठरला.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याचे वैशिष्ट्य म्हणजे वगनाट्याच्या परंपरेनुसार गौळणीचा अंतर्भाव प्रस्तुत वगनाट्यात नसतानाही फक्त बतावणीच्या जोरावर गौळणींची उणीव जाणवूनही येत नाही. या वगनाट्यातील वगाच्या कथानकासोबतच बतावणीच्या कथानकाचेही स्वतंत्र स्थान आहे. आतापर्यंतच्या सर्व वगनाट्यातील सर्वात उल्लेखनीय बतावणी म्हणून 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याच्या बतावणीचा उल्लेख करावा लागतो. आदर्श लोकनाट्य कसे असावे? याविषयीचे वसंत सबनीस यांचे विचार प्रस्तुत बतावणीतून सादर होतात. एकूण वैचारिक बतावणी असूनही प्रेक्षकांची विशेष दाद या बतावणीस मिळते.

या वगनाट्याचे कथानक हे चाळीत राहणाऱ्या मध्यमवर्गीय माणसाच्या फजितीवरूनच सुचले असल्याने त्याची मध्यवर्ती कल्पना ही मध्यमवर्गीय समाजाला केंद्रभूत अशी होती. कथानकातील बावळट राजा, चतुर हवालदार, वेंधळा कोतवाल, चतुर प्रधान ही सर्व पात्रे आपापल्या परीने विनोदनिर्मिती करत होती. वगनाट्य सादर होत असताना कथानकाला

धक्का न लावता लवचिकपणे सादर होणारे संवाद ही वगनाट्याची विशेषतः या वगनाट्यानेही जोपासलेली दिसते. त्यामुळे प्रचलित व्यवस्थेवर, घटना-घडामोडींवर या संवादांमधून टिप्पणी केल्याचे आढळते. सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचार, राजकारण, वशिलेबाजी यासारख्या घटनांचा संदर्भ वगनाट्यात आल्याने अनेक प्रेक्षकांना प्रशासकीय कार्यालयात नित्याच्या व्यवहारात येणाऱ्या अडचणींशी सांगड घातल्याचे आढळून येते आणि त्या भ्रष्टाचारावर, वशिलेबाजीवर प्रस्तुत वगनाट्यात मात केल्याने प्रेक्षकांना तो विजय हवालदाराचा झाला नसून स्वतःचाच झाल्यासारखे वाटते. यातुन प्रेक्षकांना आनंद मिळतो तो वेगळाच असतो.

या वगनाट्याचा पहिला प्रयोग २४-४-१९६५ रोजी राणीच्या बागेतील त्या वेळच्या खुल्या नाट्यगृहात झाला. त्यावेळी प्रयोग सुरू झाल्यापासून एक कोकीळ पक्षी रंगमंचावरील वाशावर येऊन बसला होता. ढोलकी सुरू झाल्याबारेबर तो आलाप घ्यायला लागला. तो थांबेच ना ! प्रयोग संपेपर्यंत कोकीळ बसल्याजागी गात राहिला होता. अनेकांनी त्याला हुसकावण्याचा प्रयत्न केला पण हलला नाही. प्रयोग संपल्यावर तो गायचा थांबला. प्रयोग संपल्यानंतर थिएटरचा रखवालदार उत्साहानं सबनीस आणि दादांकडे गेला आणि म्हणाला, 'तुमचं नशबी मोठं आहे. तुमचा कार्यक्रम संपेपर्यंत कोकीळ गात होता. तुम्ही कितीही प्रयोग करा. तुमच्या नाटकाला मरण नाही. हा मोठा शकून आहे. तुम्हाला थट्टा वाटेल पण माझा इथला अनुभव आहे म्हणून सांगतो !' आणि त्या रखवालदाराची अनुभवाची वाणी पुढे खरी ठरली.' [१]

रंजक वगनाट्यामध्ये या वगनाट्याचा अंतर्भाव होत असल्याने हास्य रसाची उधळण संपूर्ण वगनाट्यात होते. प्रसंगनिष्ठ विनोद, शाद्बिक विनोद, कोट्यांच्या माध्यमातून निर्माण होणारा विनोद या विनोदामुळे प्रेक्षक वगनाट्याकडे आकृष्ट होतात. बढतीची अपेक्षा बहुसंख्य नोकरदारांना असते. त्यामुळे हवालदाराच्या व्यक्तिरेखेमध्ये स्वतःचे प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न नकळतपणे प्रेक्षकांकडून होतो.

वेळ, काळ, स्थळ यांना अनुसरून ज्या परिसरात प्रयोग सादर करावयाचा असेल तेथे

आधी जाऊन त्या परिसराची माहिती घेऊन परिसरातील महत्त्वाच्या घटना, घडामोडी, महत्त्वाच्या व्यक्ती यांची नोंद घेऊन प्रयोग सादर करताना योग्य वेळी चपखलपणे वरील माहितीचा उपयोग करुन प्रेक्षकांना प्रयोग आपलासा भासवण्याचे कसब प्रस्तुत वगनाट्यातही असल्याचे जाणवते. त्यामुळे प्रेक्षक वगनाट्याकडे आकर्षित होतात.

वगनाट्यात असणाऱ्या 'राया मला पावसात नेऊ नका', 'झाडाला पिकलाय आंबा' सारख्या लावण्या प्रेक्षकांना भावल्या. त्यांच्या चाली लोकांच्या गुणगुण्यात येत. त्या लावण्यांनाही अफाट लोकप्रियता प्राप्त झाली.

वरील अनेक गोष्टींमुळे या वगनाट्याने अमाप लोकप्रियता जरी प्राप्त केली असली तरी या वगनाट्यामध्ये काही ठिकाणी आक्षेप घेण्यासारख्या जागा प्रकर्षाने जाणवतात. त्यामध्ये स्वत:ला कोतवाल होता यावे म्हणून आजारी असणारा कोतवाल मरण्यासाठी हवालदाराचे मारूतीला नवस करणे नीतीबाह्य वाटते. नवनियुक्त कोतवालाचा पराकोटीचा बावळटपणा हा बुद्धीस न पटणारा आहे. या वगनाट्याने सुरूवातीच्या काळात अश्लिलतेला दूर ठेवण्याचा आणि दर्जेदार प्रयोग सादर करण्याचा घातलेला पायंडा वसंत सबनीस 'विच्छा माझी पुरी करा' मधून बाहेर पडल्यानंतर हळूहळू मोडीत निघाला आणि प्रयोगाचा दर्जा अतिशय खालावला होता. हे स्वत: सबनीस यांनीही मान्य केले होते. याला कारण वगनाट्यातील विमुक्तता आणि हजरजबाबीपणाचा अतिरेक असावा तरीही या वगनाट्याचे लोकरंगभूमीवरील स्थान आणि योगदान विचारात घेता वरील आक्षेपाच्या जागा या अतिशय फिक्कट दिसतात.

उपरोक्त अनेक वैशिष्ट्यांमुळे वसंत सबनीस यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य अत्यंत लोकप्रिय ठरले. त्याला अमाप यश प्राप्त झाले आणि ते यश टिकवून ठेवण्यातही हे वगनाट्य यशस्वी ठरले. आजही प्रेक्षक 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य आवडीने पाहतात.

'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या दोन्ही वगनाट्यांनी मराठी रसिक मनाला रिझवले. मनोरंजन केले आणि त्यांना आपल्या प्रयोगातील विनोदांच्या माध्यमातून

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

खळखळून हसविले. म्हणूनच आजही 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' ही दोन्ही वगनाट्ये प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत आहेत.

## ब) प्रयोगक्षमता -

वगनाट्य हा रंजनाच्या दृष्टीने महाराष्ट्राला अत्यंत जवळचा विषय. चित्रपटांच्या आधीपासून वगनाट्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचे रंजन केले आहे आणि आजही करत आहेत. लोकांची ही रंजनाची भूक भागविण्यासाठी अनेक नामवंत लेखकांनी अनेक वगनाट्ये लिहिली. ती रंगभूमीवर सादरही केली पण त्यातील काही वगनाट्ये अत्यंत लोकप्रिय ठरली आणि काहींना म्हणावी तेवढी लोकप्रियता प्राप्त झाली नाही. लोकप्रिय ठरलेल्या अनेक वगनाट्यांमध्ये 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यांएवढी लोकप्रियता अन्य कोणत्याच वगनाट्यांना प्राप्त झाली नाही. या वगनाट्यांएवढे प्रयोग अन्य कुठल्याच वगनाट्यांच्या प्रयोगांनी क्वचितच पार पाडले असतील. या वगनाट्यांची प्रयोगक्षमता अद्वितीयच म्हणावी लागेल.

प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने मुळातच हरिभाऊ वडगांवकरांचा 'सावळा कुंभार' हा वग अत्यंत सक्षम होता आणि त्या वगावरून दादू इंदुरीकरांनी शंकरराव घाणेकर या अनुभवी विनोदी नटाच्या सल्ल्याने 'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य निर्माण केले. सावळा कुंभार वगाचे स्थूल कथानक माहिती असतानाही रंगभूमीवर प्रयोग सादर करणारा त्याकाळातील कोणताच फड यशस्वी होत नव्हता. कारण होते 'पट्टीचा सोंगाड्या' नसणे. हे आव्हान दादू इंदुरीकरांनी स्वीकारले आणि अपार मेहेनत घेऊन वगातील संवाद बसवले. योग्य त्या व्यक्तींना व्यक्तिरेखा वाटून दिल्या आणि स्वत: सावळ्याच्या भूमिकेत प्रयोगासाठी रंगमंचावर उभे राहीले . 'सावळा कुंभार' या वगाचे प्रयोग अत्यंत यशस्वी आणि लोकप्रिय होत असतानाच हा प्रयोग पाहण्यासाठी शंकरराव घाणेकर आले. संपूर्ण प्रेक्षकांसह स्वत: घाणेकरही हसून-हसून बेजार झाले आणि प्रयोग संपताच त्यांनी इंदुरीकरांना गाठून या लोकनाट्याचे 'वगनाट्यात' रूपांतर करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार 'सावळा कुंभार' या वगाचे वगनाट्यात रूपांतर झाले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आणि त्यांच्याच सल्ल्याने 'सावळा कुंभार' वगाचे 'गाढवाचं लग्न' असे पुनर्नामकरण करण्यात आले.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याच्या प्रयोगक्षमतेमुळे हे वगनाट्य प्रचंड लोकप्रिय ठरेल असा शंकरराव घाणेकरांचा होरा होता तो तंतोतंत खरा ठरला. सावळा कुंभार गंगीचं लुगडं उपरण म्हणून खांद्यावर घेऊन रंगभूमीवर उभा राहताच प्रेक्षकांमध्ये टाळ्या आणि शिट्ट्यांचे आवाज सुरू होत. सावळ्यासह इतर कलाकारांचा ग्रामीण पोषाख, बोली, देहबोली यामुळे ग्रामीण प्रेक्षकांना वगनाट्य स्वत:कडे खेचून घेते. प्रयोग सुरू असताना प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य वगनाट्यात असल्याचे जाणवते.

'गाढवाचं लग्न' ची जसराज थिएटरने केलेली एक जाहिरात वृत्तपत्रात फार गाजली. ती पुढीलप्रमाणे - 'कुणाची लग्ने सहस्त्रभोजनामुळे गाजतात, तर कुणाची राजकीय पुढाऱ्यांच्या उपस्थितीमुळे ! कुणाची मानपानामुळेही गाजतात. पण हे असं लग्न आहे की ते पाहण्यासाठी रसिक प्रेक्षक पैसे खर्च करून येतात !'[२]

या जाहिरातीवरून या वगनाट्याकडे प्रेक्षकांचा ओढा प्रचंड प्रमाणात असल्याचे सिद्ध होते. संवादाची चपलख फेक अशा प्रकारची होते की प्रत्येक संवादातून प्रेक्षकांमधून हंशा आणि टाळ्यांचा पाऊसच पडतो.

प्रयोग सादर होत असताना योग्य वेळ, काळ आणि परिस्थिती पाहून स्थानिक संदर्भान्वये केल्या जाणाऱ्या कोटींमुळे प्रेक्षकांना प्रयोग पाहण्यात वेगळीच गंमत वाटते. प्रेक्षक स्थानिक संदर्भामुळे खूष होतात.

'गाढवाचं लग्न' सादर होत असताना अनेक प्रेक्षक वारंवार 'लग्न' पाहण्यासाठी येत असत. सावळा जेव्हा इंद्राच्या दरबारात जातो तेव्हा चित्रसेन गंधर्वाकडून रंभेचा हात धरण्याची चूक होते तेव्हा सावळा 'देव कोणासी म्हणावे वर्म कळेना गुरूकिल्ली' हा संवाद अशा आविर्भावात म्हणतो की प्रेक्षकांचे श्रद्धास्थान असणारे देवांचा अपमानही प्रेक्षक निमुटपणे सहन करतात. अशा प्रकारची संवादफेक हे यशस्वी प्रयोगक्षमतेचे गमक आहे.

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे दादू इंदुरीकरांनी सुमारे २००० पेक्षा जास्त प्रयोग केले. त्यानंतर प्रकाश इनामदार, गणेश इंदुरीकर, मोहन जोशी हे आजही 'लग्ना'चे प्रयोग रंगभूमीवर सादर करताना आढळतात. या वगनाट्याच्या प्रायोगिकक्षमतेमुळेच आकाशवाणीवरुन या वगनाट्याचे तीन वेळा प्रसारण झाले. नभोवाणीच्या सर्व केंद्रांवरुन ते महाराष्ट्रभर प्रसारित करण्यात आले आणि आज मकरंद अनासपुरेसारखा आघाडीचा मराठी अभिनेता 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यावरून तयार करण्यात आलेल्या 'गाढवाचं लग्न' या चित्रपटामध्ये रसिकांची दाद मिळवत आहे.

वसंत सबनीस यांचे 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य म्हणजे मराठी रंगभूमीबरोबर, गुजराथी, हिंदी आणि इंग्रजी रंगभूमीवरही सादर झालेले आणि लोकप्रिय ठरलेले वगनाट्य होय. प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने अत्यंत कसदार असणारे हे वगनाट्य आजही मराठी माणसाच्या अभिरूचीस उतरते. मुळात हे वगनाट्य चाळीतील घराच्या चौकटीपेक्षा मोठा पलंग खरेदी करून मोडून आत नेण्याच्या फजितीवरून सबनीसांना सुचले ही फजिती त्यांच्या मित्राची. एखाद्याच्या फजितीवरून विनोद निर्माण होणे ही स्वाभाविक गोष्ट. मग ती वास्तवात असो अथवा रंगमंचावर.

या वगनाट्याचे वैशिष्ट्य म्हणजे २४-४-६५ रोजी राणीच्या बागेत या वगनाट्याचा पहिला प्रयोग पार पडत होता. गण, गौळण झाल्यानंतर वगाचे सादरीकरण करताना प्रचंड तारांबळ उडाली. कारण 'वगाच्या हस्तलिखिताची पाने व्यवस्थितपणे ठेवली नसल्याने प्रवेशांची गल्लत झाली. कुणाचा प्रवेश आधी आणि कुणाचा नंतर हे कळेनासे झाले'[३] प्रयोग सुरू असतानाच लेखक आत गेले आणि त्यांना प्रवेशाचा क्रम लावून देण्यास सांगितले. वास्तविक लेखकालाही प्रवेशाचा क्रम लक्षात नव्हता त्यांनी अंदाजे क्रम लावून दिला आणि तोच क्रम पुढे कायम राहिला.

सुरवातीला या वगनाट्याचे प्रयोग प्रत्यक्ष रंगभूमीवर कशा प्रकारे सादर होतात याची प्रयोगक्षमता किती आहे याचा अंदाज घेण्यासाठी वसंत सबनीस यांनी मधु मंगेश कर्णिक,

ज्ञानेश्वर नाडकर्णी, ह. रा. महाजनी तसेच नाटक, सिनेमा आणि पत्रकार क्षेत्रातील लोकांच्या प्रतिक्रिया विचारात घेतल्या होत्या. वगनाट्य अतिशय परिणामकारक ठरले. लोकांनी त्यावर उदंड प्रेम केले. कारण वसंत सबनीसांच्या लेखणीला दादा कोंडके यांच्या अभिनयाची साथ लाभली होती.

प्रत्यक्ष प्रयोग सादर होत असताना स्थानिक परिसराला, लोकांना, संस्थांना अनुसरून चपलखपणे कोट्या केल्या जात. त्यामुळे स्थानिक प्रेक्षक अत्यंत खूष होत. वेळ, काळ आणि परिस्थितीला अनुसरून कोटी करणे हे वगनाट्याच्या प्रयोगाचे वैशिष्ट्य 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने विशेष लोकप्रिय केले.

या वगनाट्याची बतावणी वैचारिक असूनही केवळ सादरीकरणाच्या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे तिला प्रचंड लोकप्रियता प्राप्त झाली. आदर्श लोकनाट्याची लोकांच्या मनातील संकल्पना या बतावणीमुळेच रंगमंचावर साकार झाली आणि स्वीकारली गेली.

या वगनाट्याने मराठी रंगभूमीवर सुमारे २३०० प्रयोग सादर करून प्रयोगक्षमता सिद्ध केली. त्याचबरोबर 'सैया भये कोतवाल' नावाने हिंदीत ५०, 'टेम्ट मी नॉट' नावाने इंग्रजीत ३३ प्रयोग तर 'हिरो हवालदार' नावाने गुजरातीत २० ते २५ प्रयोग सादर करून इतर भाषांमध्येही आपली प्रयोगक्षमता सिद्ध केली. एकाच संचात सलग ११८५ प्रयोग रंगभूमीवर सादर करणारे मराठी रंगभूमीवरील हे एकमेव वगनाट्य आहे.

हे वगनाट्य असंख्य प्रेक्षकांनी पुन्हा पुन्हा पाहूनही त्यांची तृष्णा भागली नाही. प्रत्येकवेळी प्रयोग पहावयास गेल्यानंतर तो प्रयोग नवा भासवणे हे या वगनाट्याच्या प्रयोगशीलतेचे अत्यंत महत्वपूर्ण वैशिष्ट्य मानावे लागेल.

१९६७ साली पुण्यात कै. स. अ. शुक्लांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नाट्यसंमेलनात 'विच्छा माझी पुरी करा' चा खास प्रयोग सादर करण्यात आला. नाट्यसंमेलनात प्रयोग सिद्ध करण्याइतपत प्रयोगक्षमता प्रस्तुत वगनाट्यात असल्याचे दिसून येते. आजही या वगनाट्याची लोकप्रियता कमी झाल्याचे दिसून येत नाही.

'गाढवाचं लग्न' असो अथवा 'विच्छा माझी पुरी करा' असो, ही दोन्ही वगनाट्ये प्रयोग साकारण्याच्या दृष्टीने अत्यंत आव्हानात्मक स्वरूपाची आहेत. पण हे आव्हान पेलणारे कलावंत या वगनाट्यांना मिळाले आणि या दोन्ही वगनाट्यांनी हजारो प्रयोग सादर आणि लोकप्रिय केले. यातील प्रत्येक प्रयोग नवा भासवण्याची किमया साधली म्हणूनच ही वगनाट्ये पुन्हा-पुन्हा पाहण्यासाठी प्रेक्षक आले.

## क) कलाकार सापेक्षता -

कोणत्याही नाट्याची यशस्वीता ही त्या नाट्यांमध्ये असणाऱ्या कलाकारांच्या अभिनयावर अवलंबून असते. प्रत्यक्ष प्रयोग सादर होत असताना तो कलाकार स्वत:च्या पात्राशी किंवा व्यक्तिरेखेशी एकरूप होऊन अभिनय सादर करत असेल तर त्याचा अभिनय उठावदार होतो. त्या नाट्यातील ती व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहाते, लोकप्रिय होते. लोकरंगभूमीवर सादर होणाऱ्या प्रत्येक कलेमध्ये कलाकार सापेक्षतेला अनन्यसाधारण महत्व असते. कारण या कलेमध्ये सादर होणाऱ्या कोणत्याच कलाप्रकाराला लिखित संहित नसते. कलाकाराला आपल्या मगदुराप्रमाणे संवाद म्हणण्याचे स्वातंत्र्य असते. मात्र कथानकात बदल न करता हे संवाद म्हटले जातात. वगनाट्य ही लोकरंगभूमीवर सादर होणारी अत्यंत लोकप्रिय कला असल्याने वगनाट्यातही कलाकारांना अत्यंत महत्व असते. अलीकडे ही वगनाट्ये लिखित स्वरूपात उपलब्ध होतात तरीही वेळ, काळ, स्थळ पाहून संवादात लवचिकता आणण्याचे स्वातंत्र्य कलावंतांना असते. किंबहुना त्यामुळे वगनाट्याला जिवंतपणा प्राप्त होतो आणि प्रयोग प्रेक्षकांच्या अभिरूचिला उतरतो. कित्येक कलावंतांमुळे कितीतरी नाट्ये यशस्वी आणि लोकप्रिय होतात. तर काही नाट्यामुळे त्यामध्ये भूमिका साकारणारे कलावंत लोकप्रिय आणि यशस्वी होतात.

प्रस्तुत 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या दोन्ही वगनाट्यांमध्ये समृद्ध नाट्यबीज, चपलख संवाद, वेधक भाषाशैली यासारखे वाङ्मयीन गुण आहेतच पण दोन्ही वगनाट्ये सादर करणारी कलाकार मंडळीसुध्दा अद्वितीयच आहेत. अनेकवेळा

कलाकाराचा अभिनय आणि हजरजबाबीपणा पाहाण्यासाठी प्रेक्षक गर्दी करताना आढळतात.

'गाढवाचं लग्न' हे वगनाट्य हरिभाऊ वडगांवकर यांच्या 'सावळा कुंभार' या वगावरून तयार केले गेले. या वगात सावळाची भूमिका स्वत: हरिभाऊ वडगावकर करत तेव्हाही हा वग अत्यंत लोकप्रिय होता. हरिभाऊंचा अभिनय आणि हजरजबाबीपणाला तोड नव्हती. हरिभाऊंच्या पश्चात या वगाचे संपूर्ण कथानक माहिती असतानाही अनेक फडमालकांना हा वग वठवता आला नव्हता कारण सावळा कुंभाराची भूमिका साकारणारा पट्टीचा सोंगाड्या मिळत नव्हता.

'सावळा कुंभार' हा वग बसविण्याचे आणि सावळा कुंभाराची भूमिका साकारण्याचे आव्हान दादू इंदुरीकरांनी स्वीकारले हा वग साकार झाल्यानंतर रंगमंचावर अतिशय लोकप्रिय ठरला. दादू इंदुरीकरांचा अभिनय अतिशय सरस होतो. त्यांच्या विनोदामुळे त्या काळातील विनोदी नट शंकरराव घाणेकरही हसून-हसून बेजार झाले आणि त्यांनीच या लोकनाट्याचे वगनाट्यात रूपांतर करण्याचा सल्ला दिला. या वगनाट्याच्या माध्यमातून दादू इंदुरीकर यांनी आपल्या अभिनयाला सिद्ध केले.

स्वत: इंदुरीकरांनी सावळ्या कुंभाराची भूमिका स्वीकारल्यानंतर गंगीची भूमिका प्रभा शिवणेकरला दिली. ढोणे मास्तरांना बृहस्पती, हणुमंता शिवणेकर दिवाणजी, इंद्र दरबारातील देवगणात मारूती यादव, राजाच्या बहिणीची भूमिका इंदू तळेगांवकरकडे तर झीलकऱ्यात राजाराम सोनवणे आणि शांताराम खरात या खड्या आवाजातील मंडळीना निवडलं. इंद्र आणि राजा सत्यवर्माची भूमिका शंकरराव शिवणेकर यांना दिली तर सत्यवर्तीची भूमिका कमल तळेगावकरला दिली.

सावळा कुंभाराची भूमिका करणारे दादू इंदुरीकर ऊर्फ गजानन राघू सरोदे यांच्या अभिनयावरच संपूर्ण वगनाट्याची यशस्वीता अवलंबून होती. इंदुरीकरांचा अभिनय, हजरजबाबीपणा बोलण्याची लकब, पोषाख, संवादफेक, देहबोली या सर्वांचे मिश्रण इतके सुंदर साधले गेले की या वगनाट्याकडे प्रेक्षकांचा उदंड ओढा निर्माण झाला.दादू इंदुरीकरांच्या उत्कृष्ट अभिनयामुळे स्वत: यशवंतराव चव्हाणांसह अमेरिकन आणि जपानी कलावंतांनी त्यांना 'महाराष्ट्राचा चार्ली चॅप्लिन' अशी बिरूदावली उत्स्फूर्तपणे दिली.

या वगनाट्यातील अभिनयामुळे चित्रमहर्षी भालजी पेंढारकर, पं. महादेवशास्त्री जोशी, तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी गांधी, यशवंतराव चव्हाण, पु. ल. देशपांडे, बाळासाहेब ठाकरे, अनंत काणेकर, बाळासाहेब देसाई, लता मंगेशकर, आशा भोसले, दादासाहेब रूपवते, शरद पवार या मान्यवरांनी दादू इंदुरीकरांच्या अभिनयाची मुक्त कंठाने स्तुती केली. या अभिनय सम्राटाला त्याच्या अभिनयामुळे 'संगीत नाटक अकादमी'चा सर्वोच्च पुरस्कार राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांच्या हस्ते देऊन देशाने त्यांचा यथोचित गौरव केला. तर 'महाराष्ट्र तमाशा परिषदेने' दादू इंदुरीकरांना 'विनोदमूर्ती' हा किताब बहाल केला. स्वत: शाहीर दादा कोंडकेंच्या अभिनयावर दादू इंदुरीकरांच्या अभिनयाची छाप होती.

दादू इंदुरीकर यांची पार्श्वभूमी ग्रामीण भागातील होती. अस्सल तमासगिराच्या किंवा तमाशा कलावंतांच्या घरात जन्म झाल्याने अभिनयाचा आणि हजरजबाबीपणाचा वारसाच त्यांना लाभला आणि तो त्यांनी जतनही केला. त्यांच्या स्वत:च्या जीवनात घडलेल्या प्रसंगांची सांगड ते प्रयोगातील संवादाशी घालत.

एकदा सचिवालयात सपत्नीक गेल्यानंतर स्वत:च्या पत्नीची साहेबांशी ओळख करून देताना इंदुरीकरांनी 'ही माझी एकट्याची बायकू !' अशी करून दिली तेच वाक्य आहे असंच 'गाढवाचं लग्न' वगनाट्याचे संवाद सादर करताना वापरले जाते.

बृहस्पतीची भूमिका करणारे ढोणे मास्तर पावसात चिंब भिजल्याने गडबडीने आत काहीही न घालता फक्त कफनी घालून वगनाट्य सादर करायला रंगमंचावर आले आणि इंदुरीकरांच्या हे ध्यानात आले तेव्हा सावळाच्या भूमिकेत असणारे इंदुरीकर त्यांना म्हणाले, 'बुवा, तू आत काय नेसला का नाय ?'[४] तेव्हापासून हे वाक्य या वगनाट्यात समाविष्ट झाले.

'गाढवाचं लग्न' च्या 'अमृतमहोत्सवी' प्रयोगाला अभिनेते रमेश देव -सीमा देव ही जोडी आलेली आणि इंद्राच्या दरबारात चित्रसेन गंधर्व रंभेचा हात धरतो तेव्हा इंदुरीकरांनी "आरे... तुमच्या देवांपेक्षा म्होटा देव आमच्या मर्त्यलोकात आहे ! 'रमेश देव' आन् त्याच्याकडे 'सीमा' आहे. हे वाक्य प्रथमच उच्चारले तेव्हापासूनन ते वाक्य 'लग्नात' समाविष्ट झाले.

'लग्नाचा २१ वा प्रयोग लालबागला असताना इंदुरीकरांना ताप भरला. कुणीतरी सांगितलं. कडकडीत पाण्यानं आंघोळ केल्यावर बरं वाटेल. आंघोळ करून अंग जवळच्या उपरण्यानं पुसलं. आता तेच ओलसर उपरणं घेऊन बोर्डावर एंट्री घ्यायची वर अंगात अजून हुडहुडी ! पण तिथंच दोरीवर 'प्रभा'चं लुगडं वाळत टाकलेलं होतं. उपरणं म्हणून ते खांद्यावर टाकून दादबा रंगमंचावर उभा राहीला. खांद्यावरल्या लुगड्यातलं दादबाचं ध्यान बघून पब्लिकनंही हसायला सुरवात केली म्हणता... पुढं ते लुगडंच खांद्यावरचं उपरणं बनलं ते शेवटपर्यंत!'[५]

या वगनाट्याच्या निर्मितीपासून लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ करण्यापर्यंत दादू इंदुरीकरांचा वाटा फार मोलाचा आहे. इंदुरीकर आणि 'गाढवाचं लग्न' ही परमेश्वरानेच मारलेली गाठ होती. 'लग्ना'मुळे इंदुरीकरांसारखा सोंगाड्या महाराष्ट्राला मिळाला तर इंदुरीकरांमुळे 'लग्न' मिळाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

दादू इंदुरीकरानंतर 'इंदुरीकरांच्या घराण्यात चौथ्या पिढीतही तमाशा कलावंतांची परंपरा चालू राहिली ती दादोबांचे सुपुत्र अभिनय श्रेष्ठ 'गणेश' च्या रूपानं. आपल्या वडिलांच्या अभिनयाचा हुबेहूब वारसा जतन करून गणेशनं नावलौकिक मिळवला. अनेक हौशी कलावंत जमवून 'गाढवाचं लग्न' त्यानं मोठ्या दिमाखात पुन्हा उभं केलं आणि दादोबा गणेशच्या रूपात पुन्हा रंगमंचावर अवतरले.'[६] त्यांनी सुमारे ५० प्रयासेग केले पण बँकेमध्ये नोकरी असल्याने त्यांना प्रयोगासाठी गावोगावी फिरता आले नाही. तसेच मधु कडू आणि छोटू सावंत यांनीही 'गाढवाचं लग्न' लावण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्या अभिनयाला मर्यादा होत्या. कारण दादू इंदुरीकरांना समाज विसरला नव्हता.

यानंतर 'गाढवाचं लग्न' यशस्वीपणे लावण्याचे इंद्रधनुष्य पेलले ते प्रकाश इनामदार या कलावंताने. प्रकाश इनामदारांचाही अभिनय सावळा कुंभाराच्या भूमिकेला साजेशी त्यांची देहबोली. त्यांची संवादफेक, प्रेक्षकांवर पडणारी छाप या सर्व गोष्टींमुळे 'गाढवाच्या लग्ना'ची लोकप्रियता अबाधित ठेवण्यात प्रकाश इनामदार यशस्वी झाले. संवादातील लवचिकता

थोड्याफार प्रमाणात प्रकाश इनामदारांनीही आणल्याचे दिसते. बृहस्पती जेव्हा सावळाला परोपकारासाठी देह झिजवण्याचा उपदेश करतो तेव्हा सावळाच्या तोंडून 'झिजव...झिजव... आन् होवू दे तुला टीबी....' असा संवाद असे. परंतु प्रकाश इनामदार मात्र 'झिजव...झिजव... आन् होवू दे तुला एड्स....' असे म्हणताना दिसतात. पूर्वी टीबी हा असाध्य रोग होता परंतु. त्या असाध्य रोगाची जागा आज 'एड्स'ने घेतल्याचे हे द्योतक आहे आणि लोकरंगभूमीवरील संवादातील लवचिकतेचा प्रत्ययही येथे येतो. जयमाला इनामदार यांनी गंगीच्या भूमिकेत प्रकाश इनामदार यांना समर्थ साथ दिलेली आहे. ही जोडी रंगमंचावर स्वत:च्या अभिनयाने अपूर्व दाद घेत असे.

प्रकाश इनामदारांच्या नंतर रंगभूमी आणि चित्रपटातील अत्यंत यशस्वी अभिनेते मोहन जोशी यांनी गाढवाचं लग्नमध्ये सावळा कुंभाराची भूमिका साकार केली. गंगीच्या भूमिकेत सविता मालपेकर यांची त्यांना समर्थ साथ असल्याचे दिसते. या जोडीनेही रंगभूमीवर अतिशय तोलाचा अभिनय सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. मोहन जोशी पृथ्वीवरील सर्वश्रेष्ठ देवांमध्ये रमेश देव आणि सीमा देव यांचा उल्लेख तर करतातच. पुढे जाऊन ते अजिंक्य देवचाही उल्लेख करतात. देवांना सिंहासनावरून उठवून खाली बसवल्यानंतर 'इंद्र मागून कपिल देवसारखा दिसतो' असे म्हणून देवांची तोंडे मॅचफिक्सिंग प्रकरणामध्ये सापडल्यासारखी दिसत असल्याची कोटीही मोहन जोशी करताना आढळतात. वर्तमान संदर्भाशी घातलेली सांगड आणि 'देव' या शब्दावर केलेली कोटी मोहन जोशींच्या स्वतंत्र अभिनयाची आणि हजरजबाबीपणाची साक्ष देतात. त्यांची दातात जीभ धरण्याची लकब प्रेक्षकांना विशेष आवडते.

मोहन जोशींनंतर सुधाकर औधडे आणि उषा साटम सावळा आणि गंगीची भूमिका साकारताना आढळतात. औधडेंच्या भाषेला विशिष्ट हेल आहे. परंतु त्यांची देहयष्टी किरकोळ असल्यांने त्यांच्या देहबोलीला मर्यादा पडतात, तरीही 'गाढवाचं लग्न' या नाट्यकृतीच्या फक्त नावामुळेही प्रेक्षक वगनाट्य पाहण्यासाठी येतात.

या वगनाट्यामध्ये सावळाची भूमिका साकारणे हे आव्हान होते. पण हरिभाऊ वडगावकर यांच्यानंतर दादू इंदुरीकर, गणेश इंदुरीकर, प्रकाश इनामदार, मोहन जोशी, सुधाकर औधडे यासारख्या कलाकारांनी ही भूमिका साकारली. इंदुरीकरांच्या अभिनयाला तर दादच नव्हती. एकदा पं. महादेवशास्त्री जोशी यांनी दादू इंदुरीकरांना आशीर्वाद दिलेला. म्हणाले, 'कलावंतांची कला संपन्न असली तर रसिक प्रेक्षक त्याच्याकडे धाव घेणारच ! कलावंतानं याचना करू नये. तो कलेचा राजा असतो. जो कलावंत जनतेबरोबर त्याच्याबरोबर जनता असते... दादबांचा अभिनय हा उसळत्या चेंडूसारखा आहे.'

'गाढवाचं लग्न' या वगनाट्याला लाभलेले सर्वच कलावंत हे सदासर्वकाळ कलेचे राजे होते. त्या कलावंतांनी 'गाढवाच्या लग्ना'चे असंख्य प्रयोग सादर केले आणि ते प्रयोग रसिक प्रेक्षकांच्या अभिरूचीला उतरवले.

१९६१ च्या 'वीणा' या दिवाळी अंकात 'छपरी पलंगाचा वग' या नावाने प्रसिद्ध झालेले आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने लोकरंगभूमीवर सादर झालेले हे वसंत सबनीस यांचे अत्यंत यशस्वी वगनाट्य होय. 'छपरी पलंगाच्या वगा'कडे स्वत: दादा कोंडके यांनी दुर्लक्ष केले होते. परंतु हा वग 'वीणा' मासिकात प्रकाशित झाल्यापासून सुमारे वर्ष-दीड वर्षानंतर तो बसवायचा निर्णय दादा कोंडकेंनी घेतला.

या वगनाट्यातील शाहीर दादा कोंडके, राम नगरकर, तुकाराम शिंदे सोडता बुहतेक कलाकार 'कामगार ग्राहक सहकारी संस्थेत' नोकरीस होते. त्यामुळे दुकाने बंद झाल्यावर सर्वजण तालमीला येत असत. या तालमी चालू असताना दादा सबनीसांकडे जात आणि प्रवेशांची मांडणी, वगातील फेरफार या गोष्टींकडे लेखकाचे लक्ष वेधत मग सबनीस तुकड्यातुकड्यांनी वगात सुधारणा करत. या वगनाट्याच्या माध्यमातुन शाहीर दादा कोंडकेंना थिएटरमध्ये व्यवसाय करायचा नव्हता तर गणेशोत्सव वगैरेंसारख्या उत्सवात वर्षातून १०-२० प्रयोग करायचे होते. वग पूर्ण बसल्यानंतर त्याचे नाव 'विच्छा माझी पुरी करा' असे राम नगरकर यांनी ठेवले आणि या वगनाट्याचा पहिला प्रयोग २४-४-१९६५ रोजी राणीच्या

बागेतील  त्या वेळच्या खुल्या नाट्यगृहात सादर झाला. लालबाग, भायखळा मार्केटमधील प्रेक्षकवर्ग प्रयोगाला हजर होता. त्या प्रयोगाला प्रवेशाच्या क्रमाबद्दल गोंधळ उडाला. लेखकाने अंदाजाने  प्रवेशाचा  क्रम ठरवून दिला आणि तोच कायम राहिला. तरीही या वगनाट्याने अतुलनीय यश संपादन केले. त्यामध्ये कलाकारांच्या अभिनयाचाही सिंहाचा वाटा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या वगनाट्यातील हवालदार ही प्रमुख व्यक्तिरेखा साकारण्याचे कार्य शाहीर दादा कोंडकेंसारख्या नटश्रेष्ठाने स्वीकारले  आणि आपल्या संपन्न अभिनयाने हे वगनाट्य लोकप्रिय केले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी साप्ताहिक 'माणूस' मध्ये दादा कोंडकेंबद्दल लिहिलं होतं, 'कोंडके  हा तरूण आम्हाला नव्यानेच  ठाऊक झाला. हा गृहस्थ  असामान्य  हुन्नरबाज आहे. आजपर्यंत हा माणूस कसा मागे राहिला याचे आश्चर्य वाटते. त्यांची तुलनाच करावयाची तर दिनकर कामण्णाशी करावी लागेल.  शाहीर दादा कोंडके  यांचे साधे चालणे, बोलणेही खट्याळपणाचे आहे. त्यांचा मिस्कील अभिनयही काही वेगळ्या ढंगाचा आहे. त्यांना मुद्दाम अभिनय करावाच लागत नाही.'[७] दादांचा अभिनय इतका सरस होता की त्यांचा अभिनय पाहण्यासाठी प्रेक्षक येत आणि प्रत्येक संवादागणीक हशा आणि टाळ्यांचा पाऊस पाडत. कितीतरी वेळा प्रयोग  पाहूनही प्रेक्षकांचे मन भरत नसे. ते पुन्हा पुन्हा प्रयोग पाहण्यासाठी येत. प्रेक्षकांचे चेहरेही कलाकारांच्या लक्षात राहू लागले. इतक्यावेळा प्रेक्षक वगनाट्य पाहण्यासाठी आले.

ज्या गावी  प्रयोग असे त्या गावी आधी जाऊन त्या गावातील महत्वाची लफडी, घटना, राजकीय कुलंगडी, नेते यांची माहिती घ्यायची आणि वगामध्ये ती नेमकेपणात वापरायची हे तंत्र दादांनी आत्मसात केले होते. त्यामुळे स्थानिक प्रेक्षक  वगनाट्यातील संवादात स्थानिक संदर्भ येताच खुष व्हायचे आणि टाळ्यांचा पाऊस पाडायचे.

हजरजबाबीपणा हा तर शाहीर दादा कोंडकेंच्या अभिनयाचा स्थायीभाव.  त्या हजरजबाबीपणाने प्रेक्षकांची प्रचंड लोकप्रियता या वगनाट्याला लाभली.

एकदा एका कॉलेजमध्ये प्रयोग असताना एक मुलगा सतत मोठ्याने बोलत होता. त्याच्या बोलण्याने प्रयोगात व्यत्यय येत होता. 'तेव्हा राजाने हवालदाराला (दादांना) विचारले, 'हवालदार दरबारात काय गडबड चालली आहे ?' हवालदाराने उत्तर दिले, 'गडबड नव्हती बडबड होती. पण बहुतेक सगळी थांबली हाय. पर योकच इसम सारखी बडबड करतोय.' राजा म्हणतो, 'त्याचा बंदोबस्त करा'. हवालदार म्हणतो,' ह्यवडं सांगू नका. मी त्याची बडबड बंद करू शकत न्हाई. कारण तो माज्या बायकूचा येडा भाऊ हाय.' प्रेक्षकांनी हा टोला उचलून धरला आणि नंतर तो मुलगा चूप झाला. !'[८]

दुसऱ्या एका प्रसंगात राजा हवालदाराला बोलवतो. तेव्हा दादांसोबत विंगेत उभा असणारा त्यांचा कालपथकातील जुना मित्र पगडी घालून कमरेला शेला बांधून स्टेजवर गेला त्याचा उद्देश दादांची फजिती करण्याचा होता. आता या मित्राच्या संवादाने प्रयोगाचा वेळ वाढवण्याची धास्ती दादांना वाटली त्यांनी महाराजांना मुजरा केला आणि स्टेजवर आलेल्या मित्राकडे बघून म्हणाले,' म्हाराज, हा नवा शिपाई, कालच याची नेमणूक झाली हाय. पण बिचारा मुका हाय.'[९] मित्राला दृश्य संपेपर्यंत मुक्याचा अभिनय करणं भाग पडलं !

अशा अनेक प्रसंगांतून शाहीर दादा कोंडकेंनी आपल्या हजरजबाबीपणाचा प्रत्यय देऊन वगनाट्यांतील लवचिकता जिवंत ठेवली आणि अनेक प्रयोग यशस्वी केले. प्रयोग लोकप्रिय केला. दादा रंगमंचावर आले की त्यांच्यात जणू रंगदेवतेचा संचार होत असे. 'एकदा जामखेड येथील प्रयोगाच्या सुरवातीसच दादांना विंचू चावला. सगळ्यांना प्रयोगाबद्दल धास्ती वाटली. प्रयोग होतो की नाही अशी परिस्थिती होती. पण दादा रंगमंचावर जाण्यासाठी तयार झाले होते. त्यांनी सगळ्यांना बजावले काही घाबरायचे कारण नाही. प्रयोग झालाच पाहिजे आणि दादांनी प्रयोग केला. त्यांच्या पायात कळा येत होत्या तरी त्यांनी एकही विनोद कमी केला नाही. समोरचा प्रेक्षक खुष झाला पाहिजे ही त्यांची धारणा होती. मग ते थिएटरमध्ये बसलेला असो की त्यांना रंगपटात भेटायला आलेला असो.'[१०] अशा प्रकारे दादा कोंडके हे रंगभूमीशी समरस झालेले त्याचबरोबर प्रेक्षकसन्मुख अभिनेते होते. त्यांनी या

वगनाट्याचे प्रयोग सादर करत असताना आपले तन, मन, धन ओतले होते. प्रेक्षकांवर त्यांचे प्रचंड प्रेम आणि विश्वास होता. त्यांनी त्यांच्या एकाच संचात 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याचे ११८५ प्रयोग करून मग 'विच्छा' बंद केली. एकाच संचात ११८५ प्रयोग सादर करणारे 'विच्छा माझी पुरी करा' हे एकमेव वगनाट्य होते.

शाहीर दादा कोंडकेंच्यानंतर श्री. विजय देसाई यांनी स्वतःच्या 'पंचमवेद' या संस्थेमार्फत 'विच्छा माझी..' चे प्रयोग सुरू केले. त्यामध्ये हवालदाराच्या भूमिकेसाठी राम नगरकर तर मैनावतीच्या भूमिकेसाठी मधु कांबीकरला घेतले गेले. शाहीर दादा कोंडकेंच्या प्रमाणेच राम नगरकर सोबतही स्वत: वसंत सबनीस बतावणीसाठी लेखकाच्या भूमिकेत उभे राहिले. मधु कांबीकर व राम नगरकर या जोडीमुळे प्रयोगाचा रंग वाढला आणि पुण्यात पुन्हा 'हाऊसफुल्ल' चा जमाना सुरू झाला. दोघांचाही अभिनय अतिशय उत्कृष्ट होता. राम नगरकर यांनी प्रत्यक्ष 'विच्छा माझी..'मध्ये पूर्वीही अभिनय केला असल्याने आणि त्यांच्या अभिनयामध्येही कस असल्याने हवालदाराची भूमिका त्यांनी अत्यंत यशस्वीपणे वठवली. प्रेक्षकांची वाहव्वा मिळवली. 'विच्छा माझी...' चा हाऊस फुल चा काळ पुन्हा परत आणला. परंतु कालांतराने मधु कांबीकर यांनी प्रयोग करण्यात असमर्थता दर्शविल्याने 'विच्छा माझी पुरी करा' चे प्रयोग पुन्हा बंद पडले. नंतरच्या काळातही राम नगरकर यांनी मधु कांबीकर शिवायही ७७ प्रयोग यशस्वी केले.

राम नगरकर यांच्या नंतर 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यातील हवालदाराची प्रमुख भूमिका विजय कदम यांच्याकडे आली. विजय कदम यांनी सुमारे २३७ प्रयोग प्रतिपदा थिएटर्ससोबत केले. हे प्रयोग ४-१०-१९८६ पासून २७-१०-८७ पर्यंत सादर केले.

पुढे यशोदीप थिएटर्सच्या परब यांनी विजय कदमला घेऊन ३०-९-८९ पासून पुन्हा प्रयोग सुरू केले आणि २-९-९० पर्यंत १०५ प्रयोग केले. १९९२ पासून ३-१-९९ पर्यंत विच्छाचे पुन्हा १७० प्रयोग सादर झाले. आजही विजय कदम 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य सादर करताना आढळतात.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सुरवातीच्या काळात विजय कदम विनोदासाठी दूरदर्शनच्या अनेक जाहिरातींचा वापर करताना आढळतात, तसेच अनेक चित्रपटगीतांच्या चालींचाही वापर करतात. प्रचलित राजकीय परिस्थितीवरही टीका करायला ते विसरत नाहीत. अभिनयासोबतच दिग्दर्शनाचेही काम तेच करतात. त्यांच्या अभिनयामुळे आजही 'विच्छा माझी पुरी करा' हे वगनाट्य जनमानसाचे रंजन करत आहे.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याचे 'सैया भये कोतवाल' नावाने हिंदी भाषांतर सौ. उषा बॅनर्जी यांनी केले. त्यामध्ये हवालदाराची भूमिका रघुवीर यादव करीत होते. त्यांनी उत्तरेकडील अनेक शहरांमध्ये अंदाजे ५० प्रयोग केले होते. 'मध्य प्रदेशात एका गावी प्रयोग झाला. गावची वस्ती पाच हजार होती. सर्वच्या सर्व गावकरी प्रयोगाला आले होते. त्या गावी मोठा पोलिस बंदोबस्त होता. कलकत्त्यालाही या प्रयोगाचे जोरदार स्वागत झाले.'[११]

'टेम्प्ट मी नॉट' या नावाने अस्सल मराठी लोकनाट्य इंग्रजी रंगभूमीवर १९९३ साली गेले. ते 'विच्छा माझी पुरी करा'चे भाषांतर होते. या भाषांतरात लावण्या आणि गवळणही इंग्रजीतुन सादर करण्यात येत.'इंग्रजी रंगमंचावरील श्री. दोसी वासुनिया, हिंदी रंगमंचावरील प्रसिद्ध नट श्री. उत्कर्ष मुजुमदार, श्री. राजेंद्र मेहेरा, श्री. अंजन श्रीवास्तव आणि नृत्यांगना सुजाता गोखले आणि इतर असा नटवर्ग तयार झाला.'[१२] या 'टेम्प्ट मी नॉट' चे इंग्रजी रंगभूमीवर एकूण ३३ प्रयोग सादर झाले व सर्वच स्तरातुन त्याचे स्वागतही झाले.

हे वगनाट्य इंग्रजी रंगभूमीवर सादर करत असताना मराठी लोकनाट्यातील लवचिकता, चपळता, अस्सलता आणि उत्स्फूर्तता यांची उणीव अजिबात जाणवली नाही. जितक्या सहजतेने मराठी लोकरंगभूमीवर या वगनाट्याचे प्रयोग सादर होत तितक्याच सहजतेने इंग्रजी आणि हिंदी रंगभूमीवरील कलाकार इंग्रजी आणि हिदी रंगभूमीवर प्रयोग सादर करताना आढळतात. 'श्री. जगदीश भट यांनी 'विच्छा माझी...' चे गुजरातीत भाषांतर करून 'हिरो हवालदार' या नावाने गुजराथी रंगभूमीवर सुमारे २०-२५ प्रयोग सादर केले आणि तेही काही प्रमाणात लोकप्रिय ठरले.

या वगनाट्याला मराठी रंगभूमीवर तर अभिनयसंपन्न कलावंत लाभलेच, पण मराठीसोबतच हिंदी, गुजराथी आणि इंग्रजी रंगभूमीवरही अतिशय उत्कृष्ट कलावंत लाभले म्हणून हे वगनाट्य आजही लोकांचे रंजन करत असताना आढळते.

'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' ही दोन्ही वगनाट्ये वाङ्मयीनदृष्ट्या कलाकृती म्हणून श्रेष्ठ होतीच पण या दोन्ही वगनाट्यांचे रंगमंचावर सादरीकरण होत असताना सादर करणाऱ्या कालवंताचा अभिनय त्यांचा हजरजबाबीपणा पाहण्यासाठी अनेक प्रेक्षक प्रयोगाला जात. प्रत्येक प्रयोग नवा भासविण्याची किमया या कलावंतांकडे असल्याने या वगनाट्यांना प्रेक्षकांची वानवा जाणवली नाही म्हणूनच उत्तरोत्तर ही वगनाटये अत्यंत लोकप्रिय होत गेली.

## ड) विनोद -

लोकरंगभूमीवरील लोकनाट्यातून विकसीत होऊन वगनाट्य निर्माण झाले. त्याचा हेतू लोकांचे मनोरंजन करणे हा होता. त्यातही गंभीर स्वरूपाचे वगनाट्य आणि रंजक स्वरूपाचे वगनाट्य असे प्रकार असतात. परंतु गंभीर वगनाट्यांच्या तुलनेत रंजक वगनाट्यांना प्रचंड लोकप्रियता प्राप्त झाली. कारण दैनंदिन जीवनातील व्यथा, वेदना, दु:ख क्षणभर का होईना विसरून निखळ मनोरंजनाच्या अपेक्षेने प्रेक्षक रंजनसाधनांकडे वळतात. आपले मनोरंजन व्हावे आणि आपणास आनंदाने हसता यावे हा त्या पाठीमागचा प्रेक्षकांचा उद्देश असतो. अशा प्रेक्षकांचा ओढा गंभीर वगनाट्यांपेक्षा रंजक वगनाट्यांकडे असणे स्वाभाविकच होते. त्यामुळे रंजक वगनाट्यांना प्रचंड लोकप्रियता प्राप्त झाली. या रंजक वगनाट्यांमध्ये 'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' या रंजक वगनाट्यांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. त्याला कारण म्हणजे त्या वगनाट्यांमध्ये असणाऱ्या विनोदाचे सामर्थ्य आणि विनोद सादर करण्याची पद्धती होय. या दोन्ही वगनाट्यांना अतिशय तोलामोलाचे नायक किंवा सोंगाडे प्राप्त झाले आणि त्यांनी वगनाट्यात विनोदाचे ताटवेच्या ताटवे फुलवले.

या दोन्ही वगनाट्यांमधून शाद्बिक कोट्यांच्या माध्यमातून निर्माण होणारा विनोद, दृश्य विनोद, श्राव्य विनोद, अर्थविपर्यासात्मक विनोद, प्रासंगिक हजर-जबाबीपणातून निर्माण होणारा विनोद, स्त्री-पुरूष संबंधातून निर्माण होणारा विनोद, प्रचलित परिस्थितीवर कोटी करून निर्माण होणारा विनोद अशा अनेक प्रकारच्या विनोदांची पखरण केल्याचे आढळते.

'गाढवाचं लग्न' या हरिभाऊ वडगावकरांच्या वगनाट्यामध्ये सुरूवातीपासून वगनाट्य संपेपर्यंत विनोदाचे साम्राज्य असल्याचे जाणवते. अगदी वगनाट्याची सुरवातच संसार करत असताना पुरूषांच्या संसारातील बदलत्या भूमिकेमुळे विनोद निर्माण केला आहे. पुढे गुरू शिष्यांच्या नात्यातील विमुक्ततेमुळे विनोद निर्माण होतो. बृहस्पती या गुरू सोबत सावळा हा शिष्य इंद्राच्या दरबारात जातो. तेव्हा इंद्राकडून सावळाला दरबारात बोलावले जात असताना

द्वारपाल : तुला देव आज्ञा आहे.

सावळा : मंजी मरायची आज्ञा. त्यासाठी मी स्वर्गात आलोय काय ?

या संवादात देव आज्ञा या शद्बांचा देवाज्ञा असा अर्थ घेतल्याने शब्दचमत्कृती साधली जाऊन विनोद निर्माण होतो. तर स्वर्गातून खाली आल्यानंतर गंगीला 'मरस्तवर रंडकी राहा' हा आशीर्वाद दिल्याने सावळाच्या अज्ञानातून विनोद निर्माण होतो हा उल्लेखनीय श्राव्य विनोद आहे.

दरबारामध्ये राजा आणि दिवाणजी यांच्यात राजकुमारीच्या लग्नाबद्दल चर्चा चालू असताना

दिवाणजी : महाराज, लग्न आताच कशाला करता ?

राजा : मग कधी ?

दिवाणजी : एखादं मुलगं झालं म्हणजे करा.

राजा : काय म्हणालात दिवाणजी ?

दिवाणजी : नाही सरकारना एखादं मूल झालं म्हणजे राजकुमारीचं लग्न करून टाका. एकदा बाईचं लग्न झालं बाई परक्या घरी गेल्या तर दरबारात कुनी तरी लुटू.. लुटू.....लुटू....

या संवादातून राजकुमारीलाच मूल झाल्यानंतर लग्न करा असा संदेश प्रथमदर्शनी जातो आणि अर्थविपर्यासातून विनोद निर्माण होतो. तर राजकुमारीच्या पणाची दवंडी देण्याचे प्रात्यक्षिक दिवाणजी राजाकडून करवून घेतात व पुढे 'चला पुढच्या चौकात...' असे म्हणतात तेव्हा प्रसंगनिष्ठ दृश्य विनोद घडून येतो.

सावळा पणाचा विडा उचलण्यासाठी राजवाड्यात जातो तेव्हा त्याला दिवाणजी विचारतात.

दिवाणजी : सावळा तू कधी शाळेत गेला होतास का ?

सावळा : हो गेलो होतो.

दिवाणजी : कोणत्या शाळेत गेला होतास ?

सावळा : धर्मशाळेत.

या संवादात दिवाणजींनी विचारलेल्या शाळेचा वेगळाच अर्थ घेतला जातो. सावळाच्या तोंडून शाळा या शब्दावरच कोटी करून विनोद घडवून आणला जातो.

वास्तविक संपूर्ण वगनाट्यच रंजक वगनाट्य असल्याने प्रत्येक वाक्यातून आणि दृश्यातून विनोद निर्माण होताना आढळतो. या विनोदामुळेच या वगनाट्याला लोकप्रियता प्राप्त झाली.

'विच्छा माझी पुरी करा' हे वसंत सबनीस यांचे अत्यंत लोकप्रिय वगनाट्य या लोकप्रियतेचे गमक म्हणजे वगनाट्य सादर होत असताना त्यामध्ये निर्माण होणारा विनोद. वगनाट्याच्या बतावणीपासून निखळ विनोदाला प्रारंभ होतो. शाहीर आणि लेखक यांच्यातील 'आदर्श लोकनाट्य' कसे असावे याविषयीच्या चर्चेतून अनेक विनोद घडून येतात. तमाशातील विनोद आणि शृंगाराची तुलना रूपवान देखण्या नारीशी करताना प्रचलित तमाशातील अश्लिलता दर्शविण्यासाठी मधूनच

'नाकामधूनी उंट लोंबती उवा मातल्या केसात
मळ्या गळ्यावर चिकटून बसल्या मळी साचली कानात

अजागळागत चिरगुट अंगी वास तयाला घामाचा.

रुपगर्विता असली येता कराल धावा रामाचा'

असे वर्णन करताच शाहीराच्या प्रतिक्रियात्मक अभिनयातून दृश्य विनोद आकार घेतो आणि तमाशात शृंगार सादर करताना तोल सांभाळावा असा संदेशही लोकांपर्यंत पोचतो.

वगाच्या सुरवातीलाच राज्याच्या कारभाराची चौकशी करताना राजा हवालदारास विचारतो.

राजा : चोऱ्या वगैरे हुत्यात का ?

हवालदार : छे छे ! महाराज, आपल्या रामराज्यात चोऱ्या होतीलच कशा ? फकस्त चोर त्यवडं चोऱ्या करत्यात... बाकी कुणी बी करीत न्हाई.

वास्तविक पाहता चोऱ्या करणाराला चोर संबोधले जाते आणि हवालदार चोरच फक्त चोऱ्या करतात असे विसंगत उत्तर देतो. तेव्हा हवालदाराच्या या उत्तराने श्राव्य विनोद निर्माण होतो.

राजाला शिकारीला जाताना तोफा, रणगाडे, पाळलेली दोन हरणे इ. साहित्यासह तयारीने जाण्याच्या संवादाने विदुषकी विनोद निर्माण होतो.

प्रधानाने स्वत:च्या वशिल्याने कोतवालपदी स्वत:चा मेव्हणा आप्पासाहेब नियुक्त केल्याने तो मरावा म्हणून हवालदार मारूतीला नारळ फोडतो. दिवंगत होण्याची क्रिया सर्वांसाठी समान असतानाही पांढरपेशा समाजातील भाषासंकेतांची टर उडवणे, मैयतासाठी रॉकेलच्या बाटल्यांच्या संख्येपुढे ड लिहून टिंब देणे आणि साडेपाच डझनाचा हॉटेलात नाष्टा करणे, कोतवालाने स्वत:चा हुद्दा व अधिकार शिपाई आणि हवालदाराकडून जाणून घेणे, हवालदाराने आणि शिपायाने कोतवालास पदोपदी बनवणे, कोतवाल व प्रधान या दोघांनी राजाला पलंग चोरीचे अवास्तव कारण पटवून देणे, कोतवालाजवळ मैनावतीने वेळोवेळी हट्ट करणे अशा अनेक घटना प्रसंगांमधून विनोद निर्माण होतो.

कोतवालावर सख्याची मर्जी व कोतवालास सख्यासोबत संसार करण्याची मिळालेली

शिक्षा, सख्याने कोतवालास आणि हवालदारास धनी म्हणणे आणि या दोघानाही ते पसंत नसणे, मैनावती आणि शिपाई यांच्यातील लवचिक संबंध आणि संवादामुळे अनेक विनोद निर्माण होतात.

अनेक ठिकाणी प्रचलित समाज व्यवस्थेवर कोटी करून हवालदाराच्या पात्राने अथवा ती भूमिका साकारणाऱ्या अनेक अभिनेत्यांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेसोबतच गुजराती, हिंदी, इंग्रजी प्रेक्षकांनाही पोट धरून हसायला लावले आहे. या वगनाट्यातील विनोद हे अदब राखून केलेले असल्याने वगनाट्याच्या प्रेक्षकांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय असल्याचे जाणवते.

## इ) लोकरंगभूमीवरील योगदान -

विशिष्ट विचार अथवा तत्व प्रतिपादन करणे ते लोकांपर्यंत पोहोचवणे, लोकांना पटवून त्यांचे मन परिवर्तन करणे या हेतूने लोकनाट्चे निर्माण झाली. विशिष्ट व्यक्ती असो अथवा पक्ष असो त्यांच्या विचाराचे धन लोकमानसापर्यंत पोहोचवण्यामध्ये लोकनाट्यांनी मोलाचा वाटा उचलला. विचार प्रतिपादन करणे हेच त्यांचे कार्य होते. त्यामध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. परंतु लोकनाट्यातून विकसित झालेली वगनाट्चे ही समाजमनाचे रंजन करण्याच्या हेतूनेच निर्माण झालेली होती. त्यांनी समाजाचे रंजन करण्याच्या दृष्टीने स्वत:तील वाङ्मयीन गुणधर्म विकसित केले. ते लोकांपर्यंत पोहोचवले आणि लोकांमध्ये वगनाट्य हा कलाप्रकार लोकप्रिय केला. या कलाप्रकाराने तमाशा आणि नाटक यांच्यामधली जागा पटकावली आणि नाटकाचा आणि तमाशाचा स्वतंत्र असणारा प्रेक्षकवर्ग एकत्र करून आपला स्वत:चा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग निर्माण केला. हे वगनाट्याचे रंगभूमीवरील महत्वाचे योगदान होते.

वगनाट्याचे रंजन सामर्थ्य विचारात घेऊन अनेक लेखकांनी वगनाट्यांचे लेखन केले परंतु या सर्व लेखकांच्या अनेक वगनाट्यांमध्ये काही वगनाट्चे लोकप्रिय ठरली तर काहींना फारशी लोकप्रियता प्राप्त झाली नाही. जी वगनाट्चे लोकप्रिय ठरली त्यामध्ये हरिभाऊ

वडगावकरांचे ‘गाढवाचं लग्न’ आणि वसंत सबनीस यांचे ‘विच्छा माझी पुरी करा’ ही वगनाट्ये मैलाचा दगड ठरली. त्यांनी स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण केले. आणि समाजामध्ये लोकप्रियतेचे सर्वोच्च शिखर प्राप्त केले. या दोन्ही वगनाट्यांचे लोकरंगभूमीवरील योगदान असामान्य आणि अद्वितीय असल्याचे जाणवते.

‘गाढवाचं लग्न’ हे हरिभाऊ वडगावकर यांचे वगनाट्य त्यांच्याच ‘सावळा कुंभार’ या वगावरून दादू इंदुरीकर यांनी निर्माण केले. या वगनाट्याने प्रथमच लोकरंगभूमीवर स्वत:चा ठसा उमटवला. तमाशाच्या प्रेक्षकांपासून नाटकांच्या पांढरपेशा प्रेक्षकांपर्यंत सर्वच प्रेक्षकांचे रंजन केले. तमाशातील चावट आणि अश्लिल संवादांना मर्यादा घालून तरीही संवादामध्ये लवचिकता राखून प्रयोग सादर केले. अशा प्रकारचे संवाद सादरीकरण हे या वगनाट्याचे लोकरंगभूमीवरील योगदानच म्हणावे लागेल. वगनाट्यांकडे प्रेक्षकांना वळवण्याचे कार्य करून वगनाट्य हा कलाप्रकार लोकप्रिय करण्याचे कार्य या वगनाट्याने केले. वैयक्तिक जीवनात घडलेल्या घटना प्रसंगांची सांगड प्रत्यक्ष प्रयोग चालू असताना प्रयोगातील संवादाशी घालण्याची प्रथा याच वगनाट्याने सुरू केली. या वगनाट्याने प्रथमच मराठी गावरान तमाशा रवींद्र नाट्यमंदिरासारख्या एअरकंडिशन्ड थिएटरमध्ये नेला.

विनोदाच्या निर्मितीसाठी फक्त शब्दच पुरेसे नसतात तर वास्तवाशी मिळता जुळता अभिनय रसिकांच्या मनात अचूक ठसतो याची जाणीव या वगनाट्याने करून दिली. ‘तमाशातील गर्भित शृंगार आणि विनोदाचा आदर्श डोळ्यापुढे ठेवल्यास नवसाहित्यात बोकाळलेल्या अश्लिलतेचा निचरा होईल’ असा अभिप्राय हे वगनाट्य पाहून स्वत: शिरीष पै यांनी दिला होता. यावरून तमाशातील शृंगार आणि विनोदाला या वगनाट्याने स्वतंत्र आणि आदर्श अधिष्ठान प्राप्त करून दिले, असे म्हणता येईल.

राष्ट्रपती पारितोषिक प्राप्त झाल्यानंतर ‘दादू इंदुरीकरांची मुलाखत प्रख्यात नाटककार विजय तेंडूलकरांनी घेतली ती ‘नॅशनल परफॉर्मिंग आर्ट’च्या मासिकात वाचून अमेरिकेतल्या कलावंत आणि साहित्यिकांनी या महान कलाकाराला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. या अमेरिकेतील कलावंतांसाठी ‘लग्ना’चा १२५१ वा प्रयोग रवींद्र नाट्यमंदिरात ठेवण्यात

आला. प्रयोग संपताच त्यांनी 'अमेरिकेचा पॉलमुनी मुंबईत भेटला'[१३] असा अभिप्राय दिला आणि 'गाढवाच्या लग्ना'ला अमेरिकेत येण्याचं निमंत्रण दिले. अस्सल मराठी लोककलेची नोंद वगनाट्याच्या रूपाने अमेरिकन कलावंतांनीही घेतली हे या वगनाट्यांचे श्रेय म्हणावे लागेल.

लोकरंगभूमीवर अत्यंत लोकप्रियता प्राप्त करणाऱ्या काही वगनाट्यांमध्ये वसंत सबनीस यांच्या १९६१ साली 'वीणा' मासिकातून 'छपरी पलंग' या नावाने प्रसिद्ध झालेल्या आणि 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने लोकरंगभूमीवर सादर झालेल्या वगनाट्याचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. या वगनाट्याचे लोकरंगभूमीवरील योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे.

'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने बहुजन समाजावर प्रभुत्व गाजवणाऱ्या 'तमाशा' या कला प्रकारातील अनिष्ट प्रवृत्ती बाजूला सारून त्याला आधुनिक रूप देण्याचा पहिला महत्त्वाचा प्रयत्न केला. पारंपरिक तमाशाचा बाज कायम ठेवून कथासूत्र, पात्रे व त्यांच्यातील संबंध, सोंगाड्याचा लवचिक वापर यासह समकालीन वास्तवावर गर्भित भाष्य करणारे हे वगनाट्य होय.

या वगनाट्याच्या बतावणीतून आदर्श लोकनाट्य कसे असावे याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला गेला. तमाशा किंवा लोकनाट्यात असणाऱ्या होळीबद्दल म्हणजेच अश्लिलता व बिभत्सतेबद्दल भाष्य करून महाराष्ट्राची लोककला ही महाराष्ट्रासारख्या संतांच्या भूमीला साजेशी असावी असे प्रतिपादन केले.

तमाशा, लोकनाट्य किंवा वगनाट्य यांच्या प्रेक्षकांमध्ये प्रामुख्याने पुरूष प्रेक्षकांची संख्या लक्षणीय असे. स्त्रियांचे प्रमाण नगण्यच असे. परंतु 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने पुरूषांबरोबरच स्त्रियांच्याही अभिरूचीला उतरण्याचे कार्य केले. समाजातील स्त्रियांना वगनाट्याकडे आकृष्ट केले.

वगनाट्यात थोड्याफार प्रमाणात शृंगार दाखवला पण जमलेल्या रसिक स्त्री-पुरूषांना लाजेनं मान खाली घालावी लागेल असं एकही वाक्य न उच्चारता प्रयोगाचे सादरीकरण करून दाखविले.

ज्या गावात प्रयोग असे त्या गावातील सर्व सामाजिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास करून प्रयोग सादर होत असताना मिळालेल्या माहितीवरून कोटी करण्याचे तंत्र या वगनाट्याने विकसित केले. हे तंत्र इतके लोकप्रिय ठरले की यानंतर सादर होणारी वगनाट्ये हे तंत्र वापरू लागली.

या वगनाट्याला समाजात उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या वर्गापासून सामान्य हमाल, रिक्षावाले यांच्यापर्यंतचा सर्वच प्रेक्षक लाभला. या प्रेक्षकांमध्ये स्त्रियांची संख्याही लक्षणीय होती. एक प्रकारे अश्लिलताविरहीत शृंगार रंगमंचावर सादर केला तसेच अश्लिलता, बिभत्सताविरहीत द्व्यर्थी संवाद कसा सादर करावा याचा आदर्शच या वगनाट्याने इतर वगनाट्यांसमोर ठेवला.

या वगनाट्यातील कलावंतांनीही अतिशय सरस कला सादर करून अभिनयाचा स्वतंत्र ठसा लोकरंगभूमीवर उठवला आणि इतर कलावंतांसाठी आदर्श ठेवला.

नाटक आणि तमाशा यांच्यामधली जागा जाणीवपूर्वक पटकवून नाटक आणि तमाशा या दोन्हीचा स्वतंत्र असणारा प्रेक्षकवर्ग एकत्र करून स्वत:चा स्वतंत्र प्रेक्षकवर्ग या वगनाट्याने निर्माण केला.

'विच्छा माझी पुरी करा' ने मराठी लोकरंगभूमी गाजवलीच सोबत 'हिरो हवालदार' या नावाने भाषांतरीत होऊन गुजराती लोकरंगभूमी, 'सैया भये कोतवाल' या नावाने भाषांतर करून हिंदी लोकरंगभूमी, 'टेम्प्ट मी नॉट' या नावाने भाषांतर करून साक्षात इंग्रजी रंगभूमीसुध्दा गाजवली.

अस्सल मराठी वगनाट्य इंग्रजी भाषेत गण, गौळण आणि लावणीसह भाषांतरित करून इंग्रजी रंगभूमीला आणि रसिकांना अस्सल मराठी तमाशाचा साक्षात्कार घडवून आणण्याचे कार्य प्रस्तुत वगनाट्याने केल्याचे दिसते.

दादा कोंडकेसारखा एका कामगाराचा सामान्य व अज्ञात मुलगा 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्याने नावारूपाला आणला. पुढे या दादांनी चित्रपटसृष्टी गाजवली आणि

आपले सर्वच चित्रपटांची 'गोल्डन ज्युबिली' साजरी केली. असा अद्वितीय कलावंत महाराष्ट्राला देण्याचे कार्य या वगनाट्यानेच केले.

पार्टी दौऱ्यावर असताना दौऱ्याच्या रोजच्या गावाची जाहिरात मुंबईच्या वृत्तपत्रात देण्याची प्रथा 'विच्छा माझी...' ने सुरू केली. तीही पुढे अन्य नाट्यसंस्थांनी अनुसरली. आजही या वगनाट्याची लोकप्रियता कमी झाल्याचे दिसत नाही. आज विजय कदम हवालदाराच्या भूमिकेत महाराष्ट्राचे रंजन करताना आढळतात.

'गाढवाचं लग्न' आणि 'विच्छा माझी पुरी करा' ही दोन्ही वगनाट्ये अत्यंत यशस्वी वगनाट्ये होत. लोकांना काय हवे ते देऊन तरीही लोकांमध्ये जनजागृती नैतिकतेची शिकवण देण्याचे कार्य या दोन्ही वगनाट्यांनी केले. समृध्द नाट्यबीज, हरहुन्नरी कलावंत त्यांचा हजरजबाबीपणा, ओघवती वेधक भाषाशैली, परिणामकारक रसनिर्मिती आणि लोकरंगभूमीसाठी दिलेले योगदान या गोष्टींमुळे ही वगनाट्ये रसिकांनी अक्षरश: डोक्यावर घेतली.

एका बाजूला प्रेक्षकांच्या मनातील द्वंद्व, विशिष्ट परिस्थितीला सामोरे जाताना त्यांची स्वत:ची होणारी अवस्था, त्यांच्या मनामध्ये निर्माण होणाऱ्या विविध भावभावना, त्यांच्या परिस्थितीची जाणीव अचूक टिपण्याचे कार्य या दोन्ही वगनाट्यांनी केले. तर दुसऱ्या बाजूला त्या प्रेक्षकांना अनेक ठिकाणी येणाऱ्या वाईट अनुभवांवर उपरोधपूर्ण टीका करून त्यांना खळखळून हसविले म्हणून प्रत्येक प्रेक्षकाला ही वगनाट्ये आपलीशी वाटली.

या वगनाट्यांच्या यशस्वी किंवा लोकप्रियतेची पोच म्हणून 'मकरंद अनासपुरे' या कलावंताला घेऊन 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यावरून 'गाढवाचं लग्न' हा चित्रपट निर्माण करण्यात आला. पण या चित्रपटातील नायकात हरिभाऊ वडगावकर, दादू इंदुरीकर यांचा शोध घेण्याचा प्रयत्न आधीच्या पिढीतील प्रेक्षकांकडून होताना दिसतो तर 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यावर चित्रपट निर्माण करण्यासाठी शाहीर दादा कोंडकेंच्या तोडीचा कलाकार शोधणे फार कठीण जात असावे. कारण, आपले सर्वच चित्रपट गोल्डन ज्युबिली करणारा हा कलावंत मराठी चित्रपटसृष्टीत एकमेवच आहे. परंतु 'गाढवाचं लग्न' प्रमाणेच

‘विच्छा माझी पुरी करा’  हे वगनाट्यही वाङ्मयीनदृष्ट्या अद्वितीय आहे याची साक्ष समस्त रसिक प्रेक्षक देताना आढळतात. म्हणूनच या दोन्ही वगनाट्यांनी मराठी रसिकांच्या मनांत एक वेगळेच स्थान प्राप्त केले आहे आणि ही वगनाट्ये मराठी लोकरंगभूमीवरील अजरामर वगनाट्ये ठरली आहेत.

*****

# संदर्भ

१) विच्छा माझी... एक आठवण पर्व. ले. वसंत सबनीस,
परचुरे प्रकाशन मंदिर, पहिली आवृत्ती नोव्हें. १९९९, पृ. क्र.३४.

२) कहाणी वगसम्राटाची - प्रभाकर ओव्हाळ, श्रीविद्या प्रकाशन,
प्रथमावृत्ती २ मार्च २००४. पृ. क्र. ६१

३) उनि पृ. क्र. ३३

४) कहाणी वगसम्राटाची - प्रभाकर ओव्हाळ, श्रीविद्या प्रकाशन,
प्रथमावृत्ती २ मार्च २००४. पृ. क्र. ५२

५) तत्रैव पृ. क्र. ६०

६) तत्रैव मनोगत पृ. क्र. ११

७) विच्छा माझी..एक आठवण पर्व - वसंत सबनीस,
प्रकाशन परपुरे प्रकाशन मंदिर, प्र. आ. नोव्हें. १९९९ पृ. क्र. ४२.

८) तत्रैव पृ. क्र. ६३

९) तत्रैव पृ. क्र. ६३

१०) तत्रैव पृ. क्र. ७५

११) तत्रैव पृ. क्र. १०६

१२) तत्रैव पृ. क्र. १०९

१३) कहाणी वगसम्राटाची - प्रभाकर ओव्हाळ,
श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती २ मार्च २००४. पृ. क्र. ७५.

******